MHAU030054842023

दाखल दिनांक : ११.०४.२०२३
नोंदणी दिनांक : ११.०४.२०२३
निकाल दिनांक : २६ .११.२०२४
कालावधी : ०१ वर्षे, ०७ महिने, १५ दिवस

| | |
|---|---|
| | **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद (न्यायालय क्र.१०) यांचे न्यायालयात**<br>**(पीठासीन अधिकारी– श्रीमती. एस. एच. पन्हाळे )**<br>(घोषीत दिनांक – २६.११.२०२४ )<br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्रं.३१८१/२०२३,**<br>**निशाणी क्रं. २०**<br>**गु.र.नं.४७/२०२३,निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक, औरंगाबाद** |
| फिर्यादी | सरकार तर्फे ,<br>**निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक, औरंगाबाद** |
| अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | श्रीमती. एस. एल. दास |
| आरोपी | **कन्हैय्यालाल सुखनंदनलाल जैस्वाल,**<br>वय – ५५ वर्ष, व्यवसाय –मजुरी,<br>राहणार – कुंभेफळ, ता. जि. औरंगाबाद. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्रीमती. ए. के. चोपडा |

**(भाग–ब)**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | २२.०२.२०२३ |
| पहिली खबर दिनांक | २२.०२.२०२३ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | ११.०४.२०२३ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ३१.०८.२०२३ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०५.१०.२०२३ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २६.११.२०२४ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निरंक |

## (आरोपीचे तपशील)

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली. | दिलेली शिक्षा. | सुनावणी दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सीआर.पी.सी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कन्हैय्यालाल सुखनंदनलाल जैस्वाल | निरंक | निरंक | महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |

**अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यांदी/ बचाव/ न्यायालयाचे साक्षीदार**

**अ) अभियोग –**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| अ.सा.क्रं.१ | बालाजी मारुती कस्तुरे | जप्ती पंच |
| अ.सा.क्रं.२ | बेबी कौतिक नलावडे | फिर्यादी |
| अ.सा.क्रं.३ | अरुण एकनाथ तातळे | तपासी अंमलदार |

## ब) बचाव साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| डि.सा.क्रं.१ | निरंक | निरंक |

## क) कोर्ट साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी.सा.क्रं.१ | निरंक | निरंक |

## अभियोग पक्षाचे/ बचाव / कोर्ट निशाणी

## अ) अभियोग

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १. | १२/अ.सा.क्र.२ | फिर्याद |
| २. | १८/अ.सा.क्र.३ | पंचनामा |

## ब) बचाव

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## क) कोर्ट निशाणी

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १. | ९ | आरोपी वर ठेवलेला दिनांक ३१.०८.२०२३ रोजीचा दोषारोप. |

| | | |
|---|---|---|
| २. | १९ | आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन. |

**ड) मुद्देमाल**

| अनु.क्र. | मुद्देमाल क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १. | | |

## न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक २६ नोव्हेंबर २०२४)

प्रस्तुत आरोपीच्या विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये गुन्हा तोहमत आहे.

२. तक्रारदाराने दि.२२/०२/२०२३ रोजी राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, औरंगाबाद येथे नेमणूकीस असतांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, हॉटेल गुरुकृपा कुंभेफळ जालना–औरंगाबाद रोडच्या कडेला ता.जि.औरंगाबाद येथे एक इसम अवैधरित्या विनापरवाना देशी व विदेशी मदयसाठा जवळ बाळगून बेकायदेशीरपणे चोरटी विक्री करत आहे. सदर बातमीवरुन ते, दोन पंच आणि इतर पोलीस स्टाफ असे घटनास्थळी छापा टाकला असता तेथे काउंटरवर एक इसम बसलेला दिसून आला. त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याचे नाव कन्हैय्यालाल सुखनंदनलाल जैस्वाल असे सांगितले. आरोपी हा बेकायदा विनापरवाना देशी दारु भिंगरी संत्राच्या १८० एम.एल. च्या ३९ सिलबंद बाटल्या रु.२७३०/– किंमतीचे बेकायदेशीर विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात व कब्जात मिळून आला त्यामुळे तक्रारदाराने आरोपी विरुध्द राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक, औरंगाबाद येथे तक्रार दाखल केली.

३. प्रथम खबरी अहवालानुसार राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक, औरंगाबाद येथे आरोपी यांचे विरुध्द गु.र.क्र.४७/२०२३ हा महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी श्री. ए.ई. तातळे यांनी गुन्हयाचा तपास करुन, साक्षीदारांचे जाबजबाब नोंदवून, जप्ती पंचनामा केला, त्यावरुन आरोपीचे विरुध्द योग्य पुरावा मिळाल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३ नुसार आरोपीचे विरुध्द भारतीय दंड संहिता कलम महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई ) या गुन्हयाकरिता अंतिम अहवाल सादर केला.

४. प्रस्तुत केसचे कामी आरोपी हजर राहिला. आरोपीचे विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये दोषारोप (निशाणी–०९) ठेवण्यात आला. आरोपीने त्याला गुन्हा कबूल नसल्याचे कथन केले. अभियोगपक्षाच्या पुराव्यानंतर आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) अन्वये संपरीक्षा निशाणी १९ वर नोंदविण्यात आली. आरोपीने त्याचे निवेदनात खोटी केस दाखल केलेबाबत कथन केले.

५. अभियोग पक्षातर्फे सरकारी वकिल श्रीमती. एस.एल.दास मॅडम व आरोपीतर्फे विधिज्ञ श्रीमती. ए. के. चोपडा यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. उपलब्ध अभिलेखाचे अवलोकन केले असता व आरोपीचे विरुध्द तोहमत असणा–या गुन्हयाचे स्वरुप पाहता खालील प्रमाणे वादप्रश्न उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष व त्याबाबतची कारणमिमांसा खालीलप्रमाणे–

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे शाबीत करतो का की, दिनांक दि.२२/०२/२०२३ रोजी १९.०० च्या सुमारास हॉटेल गुरुकृपा कुंभेफळ जालना–औरंगाबाद रोडच्या कडेला ता.जि.औरंगाबाद येथे आरोपी हा त्याच्या स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी कोणताही परवाना नसताना देशी दारुभिंगरी सत्रा १८० एम.एल. च्या ३९ सिलबंद बाटल्या रु.२८८०/– किंमतीचे एका कागदी खोक्यात ठेवून बेकायदेशीर विक्री करीत असताना मिळून आला म्हणून महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला ? | नाही |
| २. | अंतिम आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>वादप्रश्न क्र. १ व २ बाबत –</u>

६. आरोपी याचेविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) नुसार गुन्हा तोहमत आहे. अभियोगपक्षाच्या कथनानुसार, आरोपी हा घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी बेकायदा

विनापरवाना देशी दारुची भिंगरी संत्रा विक्री करीत असतांना मिळून आला. सबब आरोपी हा घटनास्थळी बेकायदा विनापरवाना देशी दारुची विक्री करीत असताना मिळून आला ही बाब अभियोगपक्षाला शाबीत करणे गरजेचे आहे.

७. अभियोगपक्षाने त्याकरीता तक्रारदार बेबी यास (सा.क्र.२) म्हणून निशाणी ११ वर तपासले. सदर साक्षीदाराने त्याचे तोंडी पुराव्यात असे कथन केले की, दिनांक २२.०२.२०२३ रोजी ते दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत होता. त्यादिवशी कार्यालयात असतांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, कुंभेफळ येथे एक इसम नामे कन्हैय्यालाल सुखनंदलाल जैयस्वाल हा देशी दारुची विक्री करत आहे. सदर बातमी निरीक्षक साहेबांना दिली असता, त्यांनी दोन पंचांना बोलावून घटनेची माहिती सांगितली. सदर दोन पंच, इतर पोलीस स्टाफ असे बातमीच्या ठिकाणी छापा टाकला असता हॉटेलमध्ये प्रवेश केला असता काउंटरवर एक इसम दिसून आला. साहेबांनी त्यास त्याचे नाव, गाव विचारले असता त्याने त्याचे नाव कन्हैय्यालाल सुखनंदलाल जैस्वाल असे सांगितले. त्याच्याकडे दारु बाळगण्याचा अथवा विक्री करण्याचा परवानाबाबत विचारल असता तो काही बोलला नाही. साहेबांनी हॉटेलची झडती घेतली असता त्यामध्ये देशी दारु भिंगरी संत्राच्या एकूण ३९ बाटल्या आढळून आल्या. त्यापैकी दोन बाटल्या सी.ए. तपासणी करता वेगळया काढल्या. त्यानंतर त्यांनी आरोपी विरुध्द फिर्याद नि.क्र.१२ दिली. उलटतपासात सदर साक्षीदाराने मान्य केले आहे की, घटनास्थळ हे रहदारीचे ठिकाण आहे. हॉटेल गुरुकृपाच्या मालकीबाबत त्यांनी स्वतः माहिती घेतली नाही. पंचांना त्यांच्या समक्ष लेखी नोटीस दिली नाही. जप्त मुद्देमालाचा बॅच क्रमांक व उत्पादन दिनांक त्यांना सांगता येणार नाही.

८. अभियोगपक्षाने त्याकरीता तपासी अंमलदार अरुण तातळे यास (सा.क्र.३) म्हणून निशाणी १७ वर तपासले. सदर साक्षीदाराने त्याचे तोंडी पुराव्यात असे कथन केले की, सन २०२३ मध्ये ते निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत असतांना गुप्त बातमी मिळाली की, कुंभेफळ– जालना रोड येथे अवैधरित्या देशी दारुची विक्री चालु आहे. त्यानुसार निरीक्षक साहेब, ते व इतर पोलीस स्टाफ घटनास्थळी संध्याकाळी ०५–४५ वा. छापा टाकला असता तेथे एक इसम हॉटेल गुरुकृपाच्या काउंटरवर बसलेला होता. त्याचे नाव कन्हैय्यालाल जैस्वाल असे होते. त्याच्या काउंटरची तपासणी केली असता त्याठिकाणी देशी दारु

भिंगरी संत्राच्या १८० एम.एल. च्या ३९ सिलबंद बाटल्या मिळाल्या. त्यातून दोन बाटल्या सी.ए. तपासकामी वेगळया काढल्या. दोन पंचांसमक्ष मुद्देमालाचा पंचनामा नि.क्र.१८ केला. आरोपीस ४१ अ ची नोटीस दिली. सदब बाबतील फिर्याद देण्यात आली. सदरील गुन्हयाच तपास त्यांच्याकडे देण्यात आला. तपासकामी सी.ए.तपासकामी पत्र पाठविले. साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले. तपासात आरोपी हा अवैधरित्या देशी दारु भिंगरी संत्रा विक्री करत असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे आरोपी विरुध्द दोषारोप पत्र दाखल केले. उलटतपासात सदर साक्षीदार मान्य करतो की, घटनास्थळ आजु–बाजुला घरे असून तेथे वाहनांची वर्दळ असते. तपासा दरम्यान त्यांनी कोणाचेही जबाब नोंदविले नाही. पंचांना लेखी नोटीस दिली नव्हती. हॉटेलच्या मालकीबाबत काही माहिती घेतली नाही. जप्त दारुचे उत्पादन व बॅच नंबर ते सांगू शकत नाही. पंचांच्या जेथे सहया आहेत तेथे नाव लिहिलेले नाही.

९. अभियोगपक्षाने जप्ती पंच बालाजी (सा.क्र.१) यास नि.क्र.१० वर तपासले. सदर साक्षीदाराने त्याच्या तोंडी पुराव्यात असे कथन केले की, दि.२२/०२/२०२३ रोजी तो कामानिमित्त राज्य उत्पादन शुल्क येथील कार्यालयात गेला होता. तेथे पोलीसांनी त्याची कागदावर सही घेतली होती. त्या कागदावर काय लिहिले होते हे त्याला आठवत नाही. त्याची अ.क्र.१ वर सही आहे. परंतु त्यातील मजकूर त्याला माहित नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षातर्फे साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारण्यात आले. परंतु त्यातून देखील अभियोग पक्षास उपयुक्त होईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे फिर्यादी यांच्या साक्षीला स्वतंत्र पंच साक्षीदाराची पृष्ठी मिळत नाही व पंचनामा स्वतंत्र साक्षीदारांच्या जबान्यातून सिध्द झाला नाही.

१०. सदरकामी एकंदरीत साक्षीपुरावा पहाता तक्रारदार व इतर साक्षीदार हे पोलीस असल्याने ते अभियोग पक्षास हितकारी साक्षीदार आहेत. घटनास्थळ हा लोकवस्तीचा भाग असतांना देखील तपासिक अंमलदार यांनी स्वतंत्र साक्षीदारांची तपासटिपणे नोंदविलेली नाहीत. पंचनामा स्वतंत्र साक्षीदाराच्या जबानीतून शाबीत झाला नाही. त्यामुळे जप्त मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातून मिळाला याबाबत व आरोपीची घटनेमधील समावेशाबाबत शंका निर्माण होते.

११. मुंबई मद्य निषेश कलम १९४९ चे अंतर्गत दाखल खटल्याच्या सिध्दतेसाठी हत्तगत

केलेला मुद्देमाल हा निषिध्द मद्य व त्याचा आरोपीकडे सजग ताबा असलेबाबत सिध्द करणे अभियोग पक्षावर अनिवार्य आहे. त्यामुळे जप्ती पंचनामा सिध्द झाला नाही. त्यामुळे आरोपीकडून मुद्देमाल जप्त झाला ही बाब सिध्द झाली नाही. सदरचा मुद्देमाल हा घातक व मादक स्वरूपाचा द्रव्य किंवा दारू रसायण हा पदार्थ आहे ही बाब अभियोगपक्षाला शाबीत करणे गरजेचे आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता जप्त केलेला मुद्देमालातील एक नमुना बाटली ही रासायनिक तपासणीकरीता पत्राने पाठवलेली होती. परंतु सदर पत्राचे अवलोकन केले असता तपासी अधिकारी याने एक नमूना बाटली ही न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे अभिप्राय मिळणेबाबत पाठवली असल्याचे दिसून येत आहे. परंतु अभिलेखाचे अवलोकन केले असता त्याबाबतचा कोणताही अहवाल अभियोगपक्षाने दाखल केला नसल्याचे दिसून येते. त्यामुळे जप्त केलेल्या मुद्देमालातील द्रव्य पदार्थ हा घातक व मादक स्वरूपाचा दारू रसायण आहे ही बाब योग्य प्रकारे शाबीत होवू शकलेली नाही. रासायनिक परिक्षणाचा अहवाल हा सदरचा द्रव्य पदार्थ कोणत्या स्वरूपाचा आहे हे शाबीत करण्याकरीता महत्वाचा आहे. त्यामुळे सदर अहवालाच्या अभावी जप्त केलेल्या मुद्देमालातील द्रव्य पदार्थ हा घातक व मादक आहे ही बाब अभियोगपक्ष शाबीत करू शकलेला नाही. त्यामुळे आरोपीविरुध्द प्रस्तुत असलेला गुन्हा शाबीतीसाठी आवश्यक घटक देखील शाबीत झाला नाही.

१२. महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) चा विचार करता आरोपी हा मादक द्रव्याची बेकायदा विनापरवाना विक्री करीत होती ही बाब अभियोगपक्षाला शाबीत करणे गरजेचे होते. परंतु त्याचेकडे असणारा द्रव्य पदार्थ हा मादक स्वरूपाचा आहे ही बाब अभियोगपक्ष शाबीत करू शकलेला नाही. त्यामुळे महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) नुसार तोहमत असणारा गुन्हा हा अभियोगपक्ष शाबीत करू शकलेला नाही. अभियोग पक्षाने आणलेला पुरावा हा आरोपीला दोषी धरणेइतपत पुरेसा नाही. त्यामुळे सबळ पुराव्या अभावी आरोपी विरुध्द प्रस्तुत गुन्हा अभियोग पक्षास संशया पलीकडे जावून शाबीत करणेस अपयश आलेले आहे. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे, म्हणून मुद्दा क्र. १ करीता " नकारार्थी " उत्तर देत आहे.

**मुद्दा क्र. २ बाबत–**

१३. मुद्दा क्र. १ चे उत्तरास अनुसरुन आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. जप्त मुददेमाल काचेच्या बाटल्या किंमत शून्य असल्यामुळे ते अपिल कालावधीनंतर नष्ट करणे योग्य

होईल. म्हणून खालील आदेश पारित करण्यात येते आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी कन्हैय्यालाल सुखनंदलाल जैस्वाल याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५( ई) नुसार दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल अपीलाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक, औरंगाबाद यांचेकडे पाठविणेत यावा.

३. आरोपीचा वैयक्तीक व जामीनदाराचे बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

४. आरोपी याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम–४३७ (अ) अन्वये वैयक्तीक व जामीनदाराची रुपये १०,०००/– (रुपये दहा हजार फक्त ) इतक्या रक्कमेची बंधपत्रे सादर करावे.

(न्यायनिर्णय खुले न्यायालयात निवेदित व अधिघोषित केला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
PANHALE SWATI
HANMANTRAO
Date: 2024.11.26
17:04:03 +0530

दिनांक – २६.११.२०२४ (श्रीमती एस. एच. पन्हाळे )

ठिकाण – औरंगाबाद प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र.१०), औरंगाबाद.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : राकेश आर. पेदापल्ली |
| न्यायालयाचे नाव | : १० वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : २६.११.२०२४ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : २६.११.२०२४ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : २६.११.२०२४ |